# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र . 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी : 2620601,2690602,2641150/51 फॅक्स : 2692102,269007

तार : EDUTECH E-mail:- desk9@dte.org.in Web:- http://www.dte.org.in


तात्काळ/कालमर्यादित / Speed post

क्रमांक – 9(2)/रासेयो/2018/392
दिनांक – 11 JAN 2018

प्रति,
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद
अमरावती व नागपूर

विषय - राष्ट्रीय सेवा योजना तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालिल सर्व **अशासकीय अनुदानित व विना-अनुदानित तंत्रनिकेतनांमध्ये** सुरु करणेबाबत

संदर्भ - 1) शासन निर्णय क्र.संकीर्ण-2010/(132/2010)/साशि-7 दि.9-12-2010
2 ) शासन पत्र क्र.रासेयो-2017/प्र.क्र.68/साशि-7 दि.21-3-2017

उपरोक्त विषयाबाबत शासनाच्या वरील संदर्भीय पत्रानुसार शासनाने सुचित केलेले आहे की, राष्ट्रीय सेवा योजना तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालिल सर्व तंत्रनिकेतनांमध्ये सुरु करावी.

याबाबत आपणांस कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजना ही 100% केंद्र पुरस्कृत योजना आहे. संदर्भीय शासन निर्णय क्र.1 अन्वये सन 2017-18 पासून सदरहू योजना या संचालनालयाच्या अंतर्गत असलेल्या सर्व **अशासकीय अनुदानित व विना-अनुदानित** संस्थांमध्ये स्वखर्चाने म्हणजेच स्वयंनिर्वाह राष्ट्रीय सेवा योजना एकक (**Self Finance Unit**) सुरु करण्यासाठी आदेशीत करण्यात येत आहे. सन 2017-18 या वर्षासाठी प्रत्येक संस्थेसाठी 50 विद्यार्थी संख्या व 1 कार्यक्रम समन्वयक(संस्थेतील मंजूर अधिव्याख्याता) मंजूर करण्यात येत आहे. याबाबत मा.संचालकांचे प्राचार्यांना संबोधून लिहिलेले पत्र सोबत जोडले आहे. सदर पत्र व योजनेशी सबंधित शासन निर्णय व नियमावलीसह आपल्या विभागातील सर्व अनुदानित व विना-अनुदानित तंत्रनिकेतनांना पाठविण्यात यावे. विभागीय कार्यालयांनी संस्थांची नावे, विद्यार्थी नोंदणी संख्या व कार्यक्रम समन्वयकांची नावे याची माहिती विनाविलंब या संचालनालास दि.25-1-2018 पर्यंत सादर करावी. सदर माहिती शासनास तातडीने सादर करावयाची असल्याने आपण व्यक्तीश: लक्ष देऊन कार्यवाही करावी. याबाबत दिरंगाई झाल्यास आपणांस जबाबदार समजण्यात येईल. याची नोंद घ्यावी. सदरहू योजनचे उल्लेखनिय कार्य करणा-या व क्रियाशील संस्थांना शासनाच्या परवानगीने सन 2018-19 पासून नियमित संस्था म्हणून या योजनेचे शासनकडून प्राप्त (अतिरिक्त) अनुदान वाटप व विद्यार्थी संख्या वाढ करण्यात येईल.

(डॉ.सुभाष महाजन)
सहसंचालक तंत्रशिक्षण, म.रा.मुंबई

सोबत - सबंधित शासन निर्णय व नियमावली

पृष्ठांकन क्र./तंशिस/विकाना/शैवि/पदविका/2018/239
दिनांक:- 17 JAN 2018

प्रति,
प्राचार्य,
अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित
अभियांत्रिकी पदविका संस्था नागपूर विभाग,
नागपूर.

उपरोक्त पत्रात नमुद केल्याप्रमाणे संस्थानी (डि.टि.ई.कोड सहीत) विद्यार्थी नोंदणी संख्या व कार्यक्रम समन्वयकांची नांवे यांची माहिती ( Soft व Hard Copy ) Excelsheet मध्ये तात्काळ दिनांक 20/01/2018 पर्यंत या कार्यालयाच्या ronagpur@dtemaharashtra.gov.in या ईमेलवर सादर करण्यात यावी.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र . 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी : 2620601,2690602,2641150/51 फॅक्स : 2692102,269007

तार : EDUTECH E-mail:- desk9@dte.org.in Web:- http://www.dte.org.in


क्रमांक – 9(2)/रासेयो/2017/३५४

दिनांक – 10 JAN 2018

प्रति,
प्राचार्य

विषय - राष्ट्रीय सेवा योजना तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालिल सर्व **अशासकीय अनुदानित व विना-अनुदानित तंत्रनिकेतनांमध्ये** सुरु करणे..

संदर्भ - 1) शासन निर्णय क्र.संकीर्ण-2010/(132/2010)/साशि-7 दि.9-12-2010

2 ) शासन पत्र क्र.रासेयो-2017/प्र.क्र.68/साशि-7 दि.21-3-2017

---

उपरोक्त विषयाबाबत शासनाच्या वरील संदर्भीय पत्रानुसार शासनाने सुचित केलेले आहे की, राष्ट्रीय सेवा योजना तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालिल सर्व अशासकीय अनुदानित व विना-अनुदानित तंत्रनिकेतनांमध्ये सुरु करावी.

याबाबत आपणांस कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजना ही 100% केंद्र पुरस्कृत योजना आहे. संदर्भीय शासन निर्णय क्र.1 अन्वये सन 2017-18 पासून सदरहू योजना या संचालनालयाच्या अंतर्गत असलेल्या सर्व अशासकीय अनुदानित व विना-अनुदानित संस्थांमध्ये स्वखर्चाने म्हणजेच स्वयंनिर्वाह राष्ट्रीय सेवा योजना एकक (Self Finance Unit) सुरु करण्यासाठी आदेशीत करण्यात येत आहे. सन 2017-18 या वर्षासाठी प्रत्येक संस्थेसाठी 50 विद्यार्थी संख्या मंजूर करण्यात येत आहे. या योजनेबाबतचे सर्व नियम व शासन निर्णय सोबत जोडले आहेत. सन 2017-18 या वर्षासाठी प्रत्येक संस्थेसाठी 50 विद्यार्थी संख्या व 1 कार्यक्रम समन्वयक(संस्थेतील मंजूर अधिव्याख्याता) मंजूर करण्यात येत आहे. सदरहू योजनेच्या प्रशिक्षणासाठी (कार्यक्रम समन्वयकांच्या) अहमदनगर कॉलेज, अहमदनगर येथे प्रशिक्षणासाठी पाठविण्यात यावे. सदरहू योजनचे उल्लेखनिय कार्य करणा-या व क्रियाशील संस्थांना शासनाच्या परवानगीने सन 2018-19 पासून नियमित संस्था म्हणून या योजनेचे अनुदान वाटप व विद्यार्थी संख्या वाढ करण्यात येईल.

(डॉ.अभय वाघ)
संचालक तंत्रशिक्षण, म.रा.मुंबई

सोबत - सबंधित शासन निर्णय व नियमावली

उप सचिव

क्रमांक : रासेयो-2017/प्र.क्र.68/साशि-7
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक – 21-03-2017.

विषय :- रासेयो विद्यार्थी संख्या वाटपाची माहिती सादर करण्याबाबत
( रासेयो अनुदान वितरित करण्याकरिता)

राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासाच्या दृष्टीकोनातून केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयामार्फत सुरु करण्यात आलेली केंद्रशासित योजना आहे. या योजनेद्वारे संचालनालयांना विद्यार्थी संख्येचे वाटप केले जाते. महाराष्ट्राचा विचार करता शिक्षण संचालनालय +२ विभाग, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय या दोन संचालनालयांची विद्यार्थी संख्या अनुक्रमे ३४,००० व १०,००० अशी आहे परंतु आपल्या संचालनालयात मात्र सन २००५-०६ पासून ४०० इतकी विद्यार्थी संख्या व ३ महाविद्यालये दिसून येतात.

राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांना मिळणारे भविष्यातील लाभ आणि कौशल्य विकास याचा विचार करता आपल्या स्तरावरुन जास्तीत जास्त महाविद्यालयांना सन २०१७-१८ मध्ये विद्यार्थी संख्या प्राप्त करुन द्यावी व त्याप्रमाणे शासनाकडे विद्यार्थी संख्या वाढवून देण्यासाठी मागणी करावी.

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, आपल्या स्तरावरुन राष्ट्रीय सेवा योजना कक्ष मंत्रालय यांना कोणत्याही प्रकारचे सहकार्य प्राप्त होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. तरी सदर वस्तुस्थिती गांभीर्यपूर्वक विचारात घेऊन या अनुषंगाने आपल्या स्तरावरुन सर्व शासकीय / अनुदानीत / विना अनुदानीत महाविद्यालये व तंत्र निकेतन यांच्या प्राचार्यांना कळविण्यात यावे. तसेच या संदर्भात आपल्याला कोणतेही सहकार्य आवश्यक असल्यास राज्य संपर्क अधिकारी तसेच विशेष कार्य अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, मंत्रालय यांच्याशी संपर्क साधावा. तसेच संचालनालयाने राज्य स्तरावरील बैठकीसाठी कार्यक्रम समन्वयक / प्रतिनिधी पाठविणे आवश्यक आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे उपक्रम सर्वच तंत्र निकेतन / महाविद्यालयांमध्ये सुरू करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे व त्या एककांना आपल्या स्तरावरुन मान्यता द्यावी. शासनाकडून आपल्याकडे प्राप्त अनुदान आर्थिक वर्षामध्ये विविध उपक्रमांवर खर्च करणे आवश्यक आहे.

शासनाने मागितलेली माहिती त्वरीत रासेयो कक्षाकडे सादर करावी, याबाबत आपल्या स्तरावरुन निर्देश देण्यात यावेत. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनाकडे त्वरीत पाठवावा.

( किरण पाटील )
उप सचिव

प्रति,
डॉ. सुभाष महाजन,
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.

एन.एस.एस. अंतर्गत सर्व कृषि, अकृषी विद्यापीठात स्वयंनिर्वाहित रा.से.यो. एकक स्थापनेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक - संकीर्ण-२०१०/(१३२/२०१०)/साशि-७
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक - ९ डिसेंबर, २०१०

प्रस्तावना :

भारत सरकारच्या युवा व क्रीडा मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठांतर्गत उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांमध्ये व्यक्तिमत्व विकास साधण्यासाठी तसेच त्यांच्या माध्यमातून समाजामध्ये उत्कर्ष साधण्यासाठी, सन १९६९ पासून राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस्.एस्.) ही राष्ट्रातील सुमारे ३०० विद्यापीठामध्ये राबविण्यात येते.

महाराष्ट्र राज्यामध्ये उच्च व तंत्रशिक्षण विभागातर्फे २३ विद्यापीठे (कृषि, अकृषि, +२ स्तर, व्यवसाय शिक्षण, तंत्रशिक्षण, आरोग्य, मुक्त) या माध्यमातून रा.से.यो. मध्ये ३,१०,१२० विद्यार्थी स्वयंसेवक आजमितीला कार्यरत आहेत.

सदर योजनेत स्वयंसेवक नियमित कार्यक्रमांतर्गत वर्षाला १२० तास असे सलग २ वर्षात २४० तास व दोन वर्षात मिळून एका विशेष शिबिराच्या माध्यमातून ७ दिवसांचे निवासी शिबिर करताना समाजोपयोगी प्रकल्प निवडून कार्य करतो. उदा.आरोग्य विषयक, जलसंवर्धन, आपत्ती व्यवस्थापन, पर्यावरण जनजागृती इ.

स्वयंनिर्वाह राष्ट्रीय सेवा योजना एकक (Self Finance Unit) : उद्देश

या योजनेत राष्ट्रस्तरावर सुमारे ३६ लाख विद्यार्थी तर राज्यस्तरावर ३ लाख विद्यार्थी स्वयंसेवक कार्यरत आहेत. उच्चशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या तुलनेत ही संख्या फक्त १०-१५ टक्के आहे.

या उपक्रमाद्वारे सामाजिक सेवेतून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास परिपूर्ण करणारी ही एकमेव योजना असल्यामुळे सदर योजनेत विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा, या दृष्टीकोनातून राष्ट्रीय सेवा योजनेच्या दि.६ जुलै, २०१० च्या राज्यस्तरीय बैठकीत चर्चा झाल्याप्रमाणे स्वयंनिर्वाह एकक स्थापनेबाबत शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय :

उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे राष्ट्रीय सेवा योजनेच्या तत्वप्रणालीस अनुसरुन तसेच केंद्र शासनाच्या स्वयंनिर्वाह रा.से.यो. एकक स्थापनेविषयीच्या मार्गदर्शिकानुसार, राज्यात सर्व कृषि व अकृषि विद्यापीठामध्ये ही योजना सुरु करण्यात यावी.

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय सेवा योजना कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या स्वयंनिर्वाह रा.से.यो. एकक स्थापनेच्या मार्गदर्शिकानुसार, स्वयंनिर्वाह एककाची कार्यप्रणाली रा.से.यो. च्या संहितेनुसार असेल.

१) या योजनेसाठी विद्यापीठांनी प्रत्येक विद्यार्थ्यांकडून प्रतिवर्षी रुपये १०/- शुल्क आकारावे. या योजनेसाठी नाममात्र शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारण्यास केंद्र शासनाची अनुमती आहे.

२) हे शुल्क विद्यापीठामध्ये रासेयो - स्वयंनिर्वाह एकक योजना या शीर्षकाखाली जमा करावे.

३) स्वयंनिर्वाह एककामधून नोंदणी केलेल्या स्वयंसेवकासाठी नियमित कार्यक्रमासाठी रुपये २५०/- प्रतिवर्षी तसेच विशेष शिबिरासाठी रुपये ४५०/- प्रतिवर्षी खर्च करावयाचे आहेत, या दराचा विचार करुन विद्यार्थी स्वयंसेवक संख्या निश्चित करावी.

४) प्रशासकीय कार्यासाठी विद्यार्थी स्वयंसेवक संख्येनुसार रुपये २५/- प्रति वर्ष विद्यापीठाकडे राहतील त्यामधून कार्यालयीन खर्च तसेच कंत्राटी तत्वावर कर्मचारी / सेवक यांचे वेतन द्यावे.

५) प्रत्येक महाविद्यालयाने / विद्यापीठाने स्वयंनिर्वाह तसेच एककाचा लेखे अहवाल, कार्य अहवाल स्वतंत्रपणे तयार करुन राज्य शासनास दरवर्षी ३० मे पर्यंत सादर करावयाचा आहे.

६) स्वयंनिर्वाह एककासाठी लागणा-या विद्यापीठ स्तरावर कार्यालयीन साहित्याची खरेदीसाठी एकूण जमा झालेल्या निधीच्या ५% रक्कम वापरावी.

७) स्वयंनिर्वाह एककासाठी विद्यार्थी संख्या वाटप करताना महाविद्यालयाने मागणी केलेल्या पत्राचे अवलोकन व्हावे.

८) स्वयंनिर्वाह एकक योजना राबविताना, संबंधित विषयांची चर्चा विद्यापीठाच्या रासेयो सल्लागार समितीच्या बैठकीत व्हावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध केला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक : २०१०१०२११०८३७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

( डॉ.प्रमोद पाब्रेकर )
राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी

प्रति,
१) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
२) मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
३) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे स्वीय सहाय्यक

D:\My Document\SSD\Note-18.8.2010-Dr.Pabrekar.doc

राष्ट्रीय सेवा योजना
स्वयंसेवकांनी राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत
करावयाचे समाज उपयोगी उपक्रम.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः रासेयो-२०१७/प्र.क्र.८४ /१७/साशि-७
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई -४०० ०३२.
दिनांक: २६ सप्टेंबर, २०१७.

वाचा :

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.रासेयो-२०१४/प्र.क्र.४२/१४/साशि-७, दिनांक ६ सप्टेंबर, २०१४.

प्रस्तावना :

राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांनी १२० तास समाज उपयोगी उपक्रमामध्ये सहभागी होणे अपेक्षित आहे. तथापि, कोणत्या उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग महत्वाचा आहे, याबाबत संदिग्धता दिसून येत होती. यास्तव मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा कृती आराखडा तयार करावा, अशा सूचना दिल्या. त्यानुसार राज्यस्तरावर कृती आराखडा तयार करण्यासाठी दि. ०५ मे, २०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेने दत्तक गावांमध्ये ८० तासाचे योगदान देण्यासाठी काही मार्गदर्शक उपक्रम सूचित केले आहेत. हे समाजाभिमुख उपक्रम विद्यापीठांमध्ये राबविण्यासाठी सुसूत्रता यावी, यासाठी एक नियमावली तयार करावी, तसेच दत्तक गावांमध्ये नियोजनबद्ध उपक्रम राबविण्यासाठी मार्गदर्शक तत्वे असावीत, ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

विद्यापीठे व महाविद्यालयांसाठी निर्धारित उद्दिष्टे :-

१) महाराष्ट्रात ३००० गावे दत्तक घेणे (मुनीजन, विद्यापीठ दत्तक गाव, आदर्श सांसद ग्राम योजनेसह)

२) दत्तक गावांमध्ये जुलै ते ऑगस्ट या कालखंडामध्ये शाळाबाह्य मुलांना शोधून शाळेत प्रवेशित करणे.

३) सप्टेंबरपर्यंत ३००० गावांमध्ये कुपोषित मुले शोधून जानेवारी पर्यंत, दत्तक गावातील "एकही मूल कुपोषित नाही" असे ग्रामपंचायतीमार्फत प्रमाणित करणे.

४) ३००० गावामधील प्रत्येक व्यक्तीचे आधारकार्ड असणे आवश्यक आहे, तसे जानेवारीमध्ये ग्रामपंचायतीमार्फत प्रमाणित करणे.

५) दत्तक गावामधील "१८ वर्षे वयावरील प्रत्येक युवकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट आहे" असे तहसिलदाराकडून प्रमाणित करावे.

६) गॅसवरील सबसिडी सोडण्यासाठी जनजागृती करून, दत्तक गावामधील किमान एका व्यक्तीला प्रवृत्त करणे.

७) प्रत्येक महाविद्यालयाने ५ बंधारे / १००० मीटर सीसीटी/ १ तलाव स्वच्छ करणे / १ टायर बंधारा बांधणे.

८) प्रत्येक स्वयंसेवकाने एक वृक्ष लावून त्याचे संवर्धन करणे.

९) दत्तक गावातील प्रत्येक महिलेचे हिमोग्लोबीन तपासून सरासरीवर आणण्यासाठी प्रयत्न करणे.

१०) रासेयोमध्ये प्रवेश देतेवेळी शौचालय बांधलेले असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक असून, बांधलेले नसल्यास त्या विद्यार्थ्याने एक वर्षाच्या आत शौचालय बांधणे बंधनकारक आहे.

११) गड किल्ले संवर्धन -ज्या महाविद्यालयाजवळ एखादा गड आहे अशा महाविद्यालयांसाठी

अ) गड स्वच्छता

ब) गडाच्या डोंगर उतारावर सी.सी.टी. तयार करणे.

क) सी.सी.टी.लगत वृक्षारोपण करणे.

ड) स्थानिक ग्रामस्थांना गडाच्या इतिहासासंदर्भात जागरूक करणे, मार्गदर्शक म्हणून तयार करणे.

इ) पर्यावरण पूरक पर्यटनाला या माध्यमातूल चालना देणे.

शासकीय अधिकारी, सामाजिक वनीकरण, वनखाते व महाविद्यालय यांच्या माध्यमातून हा प्रकल्प राबविणे.

<u>नियमित उपक्रमांची मार्गदर्शक तत्त्वे -</u>

<u>शहरी भागातील उपक्रम</u> -

१) स्वच्छता अभियान

२) प्लॅस्टिक निर्मूलन

३) ओला कचरा व सुका कचरा यांचे वर्गीकरण करुन गांडुळ खतासाठी प्रोत्साहित करणे.

४) गलिच्छ वस्त्यांमध्ये विद्यार्थ्यांचे आरोग्य व स्वच्छता याविषयी जनजागृती करणे.

५) मलेरिया, डेंग्यू, स्वाईन फ्लू याबाबत प्रचार व प्रसाराची मोहिम हाती घेणे.

६) रेल्वे स्टेशन, बस स्टॅण्ड, धार्मिक स्थळे, थोर पुरुषांचे पुतळे, तलाव दत्तक घेणे.

७) आपल्या शहराला स्मार्ट व्हिलेजच्या स्पर्धेत भाग घेण्यास प्रवृत्त करणे.

८) शहरी भागातील धार्मिक उत्सवाच्या दरम्यान व तद्नंतर स्वच्छता मोहिम राबविणे.

९) स्वच्छतेबाबत माहितीपट तयार करुन प्रचार व प्रसार करणे.

१०) ब्लू रिबन क्लब तयार करणे व त्यांच्यामार्फत शहरी भागातील नगरपालिका व महानगरपालिका यांना सचेत करणे.

<u>ग्रामीण भागातील उपक्रम-</u>

१) देवराई व वनराई यांची निर्मिती करणे.

२) गड किल्ले, ऐतिहासिक व पर्यटन स्थळांचे संवर्धन व सुशोभीकरण करणे.

३) वणवा मुक्त शिवार तयार करण्यासाठी प्रचार व प्रसार करणे.

४) हरित महामार्ग तयार करण्यासाठी वृक्षारोपण, सुशोभीकरण व जैव विविधता संधारण करणे आणि दत्तक रस्त्यावर अपघात होणार नाही यासाठी रस्ता सुरक्षा अभियान राबविणे.

५) पाण्याच्या स्रोताच्या विविध ठिकाणांची स्वच्छता करणे.

६) प्राथमिक शाळांची स्वच्छता, आरोग्य तपासणी, गोठा स्वच्छ ठेवण्याबाबत प्रचार व प्रसार करणे.

७) कंपोस्ट खत तयार करण्यास प्रवृत्त करणे.

८) सांडपाण्याचे व्यवस्थापन किंवा शोष खड्डे तयार करणे.

९) अवयवदान, नेत्रदान, रक्तदान यावर विशेष भर देणे.

<u>स्वस्थ भारत अभियान-</u>

१) आरोग्य पत्रक (Health Card) सर्वच घरांमध्ये असेल, याचे सर्वेक्षण करणे.

२) प्रत्येक कुटुंबांचे ३००० गावांचे १०० टक्के आरोग्य पत्रक तयार करणे.

३) ३००० गावांमध्ये कुपोषित बालक शोधून गाव कुपोषीत मुक्त करणे.

४) शासनाच्या विविध आरोग्य सेवा व सुविधांचा प्रचार व प्रसार करणे.

५) आरोग्य शिबिरे आयोजित करणे.

६) महिलांच्या आरोग्याबाबत उपक्रम राबविणे.

७) कर्करोगाविषयी जनजागृती करून प्रतिबंधात्मक उपाय करणे.

८) योगाचा प्रचार व प्रसार करणे.

९) तणावमुक्त जीवनशैली निर्माण करण्यासाठी योगा शिबिरे आयोजित करणे.

१०) शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी मानसोपचार तज्ञांद्वारे समुपदेशन करणे.

११) कृषी महाविद्यालयांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी पीक रचनेमध्ये बदल करणे तसेच दुय्यम जोड व्यवसाय सुरू करण्यास प्रवृत्त करणे.

१२) पशुधन व्यवसायासाठी प्रोत्साहित करणे इ. उपक्रमांद्वारे शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीत बदल करणे.

<u>बेटी बचाओ बेटी पढाओ -</u>

१) स्त्री भृण हत्या प्रतिबंध.

२) कन्या जन्मदर वाढविण्यासाठी प्रचार व प्रसार करणे.

३) पथनाट्य, पोस्टर, प्रदर्शन तसेच स्पर्धा आयोजित करणे.

४) मुलींच्या शिक्षणाबाबत सुविधा, त्याबाबतच्या शासनाच्या योजना याविषयी जनजागृती करणे.

५) दत्तक गावातील मुले शाळाबाह्य राहणार नाहीत याची खबरदारी घेणे.

६) शैक्षणिक सुविधा, स्कॉलरशिप, रोजगार, स्वयंसहायता बचत गट, कौशल्य विकास आधारित महिला बचत गटांना सक्षम करणे.

७) कौटुंबिक वातावरण व रोजगार यांचा मेळ घालत असताना मानसिक ताणतणाव नाहीसे करण्याबाबत समुपदेशन.

८) स्त्री पुरुष मैत्री या संकल्पनेवर अधिक जाणीवपुर्वक समुपदेशन करणे.

९) निर्भय कन्या योजनेअंतर्गत स्वसंरक्षणाच्या योजनांबाबत प्रशिक्षण घेणे.

१०) कौटुंबिक मूल्य संवर्धनासाठी व वृध्दीगत होण्यासाठी जाणीव निर्माण करणे.

<u>डिजीधन-</u>

१) संगणकीय साक्षरता निर्माण करणे.

२) डिजिटल साक्षरता निर्माण करण्यासाठी डिजिटल लॉकर तयार करणे.

३) भिम ॲपचा प्रचार व प्रसार करणे.

४) बँकेच्या सहकार्याने वित्तीय साक्षरता अभियानाअंतर्गत (विशाखा) कॅशलेस महाराष्ट्र स्वयंसेवक निर्माण करण्याकरिता अनुलोन संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण आयोजित करणे.

५) जिल्हा अग्रणी बँकेच्या सहाय्याने प्रशिक्षण आयोजित करणे. यामध्ये केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा समावेश करणे इ. (मुद्रा, स्टार्ट अप)

६) जिल्हा अग्रणी बँकेमार्फत डिजीधन योजना यशस्वी करण्याकरिता आर्थिक सहकार्य मिळविणे.

७) जनधन योजनेअंतर्गत सर्व नागरिकांचे बँकेत खाते उघडणे, त्याला आधारकार्ड लिंक करून के.वाय.सी. करणे, पंतप्रधान सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना याबाबत प्रचार व प्रसार करणे व सहभागी करून घेणे.

विशेष शिबिरातील उपक्रम -

१) सन २०१७-१८ पासून एप्रिल व मे मध्ये सी.सी.टी. चे काम पूर्ण करावे व जून, जुलै किंवा ऑक्टोबर मध्ये वृक्ष लागवड करुन त्यांचे १०० टक्के संवर्धन होईल यासाठी आराखडा तयार करणे.

२) पाणी फाऊंडेशन सोबत किंवा त्यावर आधारित शिबिरे आयोजित करणे.

३) तालुक्यातील सर्व महाविद्यालयांनी एका ठिकाणी/ एका दत्तक गावामध्ये शिबिराचे आयोजन करुन साखळी पध्द्तीने निर्धारित उद्दिष्टे पूर्ण करावीत.

४) पाणी प्रश्नावर रासेयोतील मुलांनी व महाविद्यालयांनी काम करणे अपेक्षित आहे. सन २०१७-१८ मध्ये पाण्यासाठी शिबीरे घ्यावीत, शिबीरा दरम्यान सलग समपातळी चर (CCT) हे उपक्रम राबविणे बंधनकारक आहे. शिबिरा दरम्यान वनराई, गॅबीयन बंधारे, कोल्हापूर बंधारे, शोष खड्डे, पारस बाग, वृक्षारोपण इत्यादी उपक्रम राबवावेत.

५) वरील उपक्रम राबविताना शास्त्रीय पद्धतीचा वापर करावा. सर्व शिबिरे ७ दिवसांची असावीत. उद्घाटन सोहळा आणि समारोप आधीच्या व नंतरच्या दिवशी असावा.

६) विद्यापीठांनी आपल्या अधिनस्त महाविद्यालयांची शिबिरे एकाच कालावधीत आयोजित करावीत. उदा.दिवाळीची सुट्टी / नाताळची सुट्टी / उन्हाळी सुट्टी.

७) शिबिरामध्ये विद्यार्थ्यांची संख्या शासनाने वितरित केलेल्या संख्येएवढीच असणे बंधनकारक आहे.

८) एखाद्या महाविद्यालयामध्ये विद्यार्थी संख्या पूर्ण होत नसल्यास, जिल्हास्तरीय किंवा विद्यापीठस्तरीय शिबिरे आयोजित करण्याची जबाबदारी विभाग समन्वयक, जिल्हा समन्वयक आणि संचालक, रासेयो यांची राहील.

९) शिबिरामध्ये सहभागी असणाऱ्या सर्व स्वयंसेवकांचे प्रशिक्षण नियमित कार्यक्रमामध्ये अंतर्भूत करून, शिबीरपूर्व प्रशिक्षण घेण्याची जबाबदारी विभाग समन्वयक, जिल्हा समन्वयक व संचालक, रासेयो यांची राहील. प्रशिक्षणासाठी प्रशिक्षित व्यक्तींना आमंत्रित करणे आवश्यक आहे.

१०) जिल्हा व विद्यापीठस्तरीय शिबिरे ऑगस्ट ते सप्टेंबर या महिन्यात सुरु करावीत.

११) शासनाची मान्यता प्राप्त झाल्यास प्रत्येक तालुक्यात २०० मुलांचे ७ दिवसांचे शिबिर पाणी फाऊंडेशन / नाम यांच्या आर्थिक सहकार्याने राबविणे.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमाची योग्य रितीने अंमलबजावणी व्हावी; यासाठी ही नियमावली तयार करण्यात आली आहे.या आधारावर उपक्रम राबविले जावेत, असा राज्य शासनाने निर्णय घेतलेला आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९२६१५५१५८४४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Atul Hansraj Salunkhe

Digitally signed by Atul Hansraj Salunkhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=STATE LIAISON OFFICER, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b264114e5f2ab2d209a59196e3eb37b12d34901b451d626c61cd53a462c38f25, cn=Atul Hansraj Salunkhe
Date: 2017.09.26 15:40:59 +05'30'

(डॉ. अतुल साळुंके)
राज्य संपर्क अधिकारी/ विशेष कार्य अधिकारी.

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
५. संचालक, उच्च शिक्षण, पुणे,
६. संचालक,तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई,
७. शिक्षण संचालक, शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
८. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई,
९. कुलगुरु / कुलसचिव, सर्व विद्यापीठे,
१०. कार्यक्रम सल्लागार, राष्ट्रीय सेवा योजना, भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय, युवक कार्य व क्रिडा विभाग, शास्त्री भवन, नवी दिल्ली,
११. संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (दूरदर्शन, आकाशवाणी, वृत्तपत्रे इत्यादींच्या माध्यमाद्वारे यथोचित प्रसिध्दी देण्यासाठी)
१२. क्षेत्रिय संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, विभागीय केंद्र, पुणे

राष्ट्रीय सेवा योजना
स्वयंसेवकांचा राष्ट्रीय सेवा योजनेत प्रवेश देण्यासाठी नियमावली व नियमित उपक्रम आणि विशेष शिबिराची मार्गदर्शक तत्वे.

महाराष्ट्र शासन
उच्च तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक: रासेयो-२०१४/प्र.क्र.४२/१४/साशि-७
मंत्रालय कक्ष, एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, मुंबई ४०० ००१
दि. ६ सप्टेबंर, २०१४

प्रस्तावना

उपक्रम राबविण्यासाठी व दत्तक गावाची निवड करताना काही मार्गदर्शक तत्वे असावी. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सल्लागार समितीच्या सभेत चर्चा झाल्याप्रमाणे राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देताना संदिग्धता दिसून येते. राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यानंतर २ वर्षात त्यांचा सर्वांगिण विकास होतो. जसे सभाधारिष्ठ, सुप्त गुणांना वाव मिळून अनेक विद्यार्थी सर्वगुणसंपन्न होतात. भावी काळात अत्यंत यशस्वी नागरिक म्हणून गौरविले जातात. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थापनेपासून आजपावेतो ही योजना उत्कृष्ठपणे राबविली जाते. दरवर्षी रासेयोमध्ये विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून नव्याने सामाविष्ठ होतात. सर्व विद्यार्थ्यांना योग्य न्याय देण्यासाठी एक नियमावली तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तसेच समाजभिमुख उपक्रम राबविण्यासाठी व दत्तक गावाची निवड करताना काही मार्गदर्शक तत्वे असावी. ही बाब शासनाच्या विचारधीन होती.

शासन निर्णय -

**स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये प्रवेश देण्यासाठी नियमावली :**

१) स्वयंस्फुर्तीने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश प्रथम असावा.

२) प्रवेश देताना अनुसूचित जाती व जमातीतील विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यात यावे.

३) विद्यार्थ्यांना एका शैक्षणिक वर्षामध्ये एकाच योजनेमध्येच प्रवेश असावा.
उदा. एन.सी.सी./एन.एस.एस./विस्तार व निरंतर शिक्षण विभाग इत्यादी.

४) विद्यार्थ्यांची निवड करताना त्याने/तिने महाविद्यालय किंवा स्वयंसेवी संस्था स्तरावर सामाजिक कार्याशी निगडीत प्रकल्प देवून प्रकल्पाच्या मुल्यमापनावर आधारित प्रवेश देण्यात यावा. किंवा कार्यक्रम अधिकाऱ्याने तीन सलग कार्यक्रमकांचे आयोजनं करुन सर्व कार्यक्रमामध्ये सक्रीय सहभाग असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा.

५) + २ स्तर, पदवी आणि पदव्यूत्तर विभागातील विद्यार्थ्यांना रासेयोमध्ये प्रवेश देताना यापूर्वी रासेयोतील सहभाग असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्राधान्य द्यावे.

६) रासेयोमध्ये प्रवेश देताना विशेष विद्यार्थ्यांना (अंध, अपंग, शारीरिकदृष्ट्या विकलांग) प्राधान्य देण्यात यावे.

७) रासेयोमध्ये प्रवेश देताना कमी अवधान (अबोल, बुजरा नेतृत्व गुण नसणारा इ.) असलेल्या विद्यार्थ्यांना प्राधान्य द्यावे. ज्यायोगे दोन वर्षानंतर तो अष्टावधानी होऊ शकेल.

८) सर्व शाखेतील विद्यार्थ्यांना समान संधी देण्यात यावी.

९) रासेयोमध्ये प्रवेश देताना मुले व मुली यांना समान संधी देण्यात यावी.

१०) विद्यार्थी राष्ट्रीय भावनेत प्रेरित असलेल्या सामाजिक बांधिलकी जपणारा असावा.

११) रासेयोमध्ये प्रवेश देताना अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात यावे.

१२) विद्यार्थी व्यसनाधीन नसावा तसेच शिस्तप्रिय असावा.

१३) रासेयोमध्ये प्रवेश देताना विद्यार्थ्यांचे वय २५ पेक्षा जास्त असू नये. यामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वयोमर्यादेमध्ये तीन वर्षाची सूट देण्यात यावी.

१४) रासेयोमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सात दिवसाचे निवासी शिबिर करणे बंधनकारक आहे.

## नियमित कार्यक्रमाची मार्गदर्शक तत्वे

१) रासेयो उपक्रम हे २ वर्षामध्ये प्रतिवर्षी १२० तास म्हणजे एकूण २४० तास व दोन्ही अर्थात मिळू एक सात दिवसीय निवासी शिबीर.

२) प्रथम वर्ष रासेयो स्वयंसेवकासाठी तासाची विभागणी –
- २० तास उद्बोधन सत्र (Orientation Programme)
- २० तास महाविद्यालयस्तर उपक्रम
- २० तास विद्यापीठाने पुढाकार घेतलेले उपक्रम
- ६० तास वस्ती पातळीवरील दत्तक गाव येथे राबविण्यासाठी उपक्रम (कमीत कमी २ उपक्रम असावेत व उपक्रमांच्या तासांची मर्यादा कमीत कमी २० व जास्तीत जास्त ६० तास इतकी असावी.)

३) द्वितीय वर्ष रासेयो स्वयंसेवकांसाठी तासांची विभागणी–
- २० तास महाविद्यालय स्तरावरील कार्यक्रम/उजळणी
- २० तास विद्यापीठाने पुढाकार घेतलेले उपक्रम
- ८० तास वस्ती पातळीवरील दत्तक गाव/खेडे येथील उपक्रम

४) रासेयो स्वयंसेवकांकरिता उद्बोधन सत्र अंतर्गत खालील उपक्रमांचा समावेश असावा.
- रासेयो विषयी सर्वसाधारण उद्बोधन (रासेयोचा इतिहास, रासेयो जडणगडण, रासेयो उद्दिष्टे, ध्येय याविषयी मार्गदर्शन)
- विशेष उपक्रमाविषयीचे उद्बोधन
- कौशल्यावर आधारित उद्बोधन
- विशेष शिबिरांसाठी उद्बोधन

५) महाविद्यालयस्तर उपक्रम –
- सदर उपक्रम दरम्यान विद्यार्थ्यांना श्रमप्रतिष्ठा शिकविणारे उपक्रम राबविण्यात यावेत.
- महाविद्यालय परिसर विकसित करण्यासाठी उपक्रम – उदा. क्रिडांगण तयार करणे, वृक्षारोपण उर्जा लेखा–जोखा (Energy Audit), पर्यावरण संवर्धन, वृक्षगणना, हटिंग हजार्ड, (धोके शोध मोहिम) इत्यादी.

६) विद्यापीठाने पुढाकार घेवून योजलेले उपक्रम
- उदा. समर्थ भारत अभियान, मुनीजन ग्राम अभियान, ऊर्जा संवर्धन, कन्यारत्न अभियान, रस्ता सुरक्षा अभियान, रासेयो प्रचार व प्रसार सप्ताह इत्यादी.
- विद्यापीठ सल्लागार समितीने सूचविलेल्या विशेष मोहिमा/उपक्रम

७) खेडे/दत्तकगाव पातळीवरील उपक्रम –
- स्वयंसेवकांना समाजामधील विविध प्रश्नांची जाणीव होणे व त्या संदर्भात उपक्रम राबविण्यासाठी जास्तीत जास्त तास वसती पातळीवरील उपक्रमांकरिता राखून ठेवण्यात आले आहे. सदर उपक्रमांमधून विद्यार्थी व व्यक्तीमध्ये एक सामाजिक बंध निर्माण होवून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व व्यक्तिमत्व विकास घडण्यास मदत होईल असे उपक्रम राबविण्यात यावेत.
- सामाजिक स्वयंसेवी संस्थामार्फत वसतिपातळीवरील विविध प्रश्नांवर कार्यक्रम/उपक्रम उदा. वृध्दाश्रम, अनाथाश्रम, निवासी सामाजिक उपक्रम करणाऱ्या संस्था.
- ग्राम विकासाचे उपक्रम – उदा. साक्षरता जल व माती व्यवस्थापन, शेती विषयक उपक्रम, आरोग्य, बालसंगोपन, बचत गट, रस्ते बांधणी किंवा दुरुस्तीकरण.

८) शहरी भागातील उपक्रम –
- साक्षरता, वसतिविकास, स्वच्छता, नागरी, सुरक्षा, अनाथालये, सार्वजनिक इस्पितळे, लोकसंख्या शिक्षण, नशाबंदी उपक्रम, एडस् प्रतिबंधक उपक्रम इत्यादी कार्यक्रमांतून सहभाग.

९) राष्ट्रीय व नैसर्गिक / मानवनिर्मित आपत्ती व्यवस्थापनाचे उपक्रम.

- भूकंप, पूर, वादळ, अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट बॉम्बस्फोट इत्यादि नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती व्यवस्थापन.

१०) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय महत्वाचे दिवस व सप्ताह रासेयो अंतर्गत महाविद्यालयात साजरे करणे.

## विशेष शिबिराची मार्गदर्शक तत्वे

विशेष शिबीर हा राष्ट्रीय सेवा योजनेचा आत्मा असल्यामुळे शिबिराचे नियोजन, आयोजन व यशस्वीरित्या पूर्तता हा अत्यंत महत्वाचा भाग आहे. शिबीर हा राष्ट्रीय सेवा योजनेचा अविभाज्य घटक आहे. या शिबीरात युवकांसाठी खूप चांगल्या प्रकारची संधी आहे. कारण यामध्ये विद्यार्थ्यांना एकत्र राहणे, एकमेकांच्या अनुभवाची देवाण-घेवाण करणे. सतत सामाजिक गोष्टींच्या चर्चेद्वारे विचार-विनिमय करणे, सामाजिक प्रश्नांची चर्चा करुन ते प्रश्न, समस्या, अडचणी यावर उपाय शोधण्यासाठी प्रयत्न करणे. राष्ट्रीय सेवा योजनेत असलेल्या संख्येच्या ५० टक्के स्वयंसेवक विशेष शिबिरात सहभागी होतात व इतक्या मोठ्या प्रमाणात असणाऱ्या या युवकांच्या माध्यमातून फार मोठ्या प्रमाणात दर्जेदार व उत्कृष्ट असे काम उभे राहू शकते.

**शिबीराचा उद्देश :-** विशेष शिबिर देशपातळीवरील विविध प्रगतीच्या दृष्टिने महत्वाचे असणाऱ्या विषयाचा गाव पातळीवर अवलंब होण्यासाठी केला जातो. आजपर्यंत विशेष शिबिराच्या माध्यमातून युवक व खेड्यांचा विकास "बलशाली भारतासाठी सुदृढ युवक", "राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक एकात्मता", "साक्षरता व युवक", शास्वत प्रगतीसाठी युवक", यामध्ये सी.सी.टी.व्ही., पाणी व व्यवस्थापन व नियोजन, नापीक जमीन व्यवस्थापन, वृक्षारोपण, बंधारे बांधणे, एडस् जनजागृती इत्यादि संकल्पना राबविल्या आहेत.

सन २०१४-१५ करिता "जल व्यवस्थापन" अशी केंद्रीय संकल्पना देण्यात येत आहे.

- शिबिरात जेवण हे साधे, रुचकर व स्वयंसेवकांच्या मदतीने बनविलेले असावे.
- दत्तक गावाच्या आवश्यकतेनुसार व लोकांच्या गरजेनुसार लोकांच्या सहभागातून उपक्रम राबवावेत.

**शिबीरातील कार्यक्रम**

१. शिबीरातील दिनचर्या ही ग्रामीण भागाशी मिळती-जुळती व स्वयंसेवाकांच्या दृष्टीने हितकारक असावी. त्यामुळे शिबीरात शिस्त व सक्रिय सहभाग राहील.
२. विशेष शिबीर हे ग्रामस्थांशी सुसंवाद व त्यांच्यामधून अनेकविध गोष्टींचा अभ्यास करण्यासाठी असावे.
३. श्रमदान, सांस्कृतिक, बौध्दिक कार्यक्रमांद्वारे स्वयंसेवक व ग्रामस्थांना एकत्रित आणण्याचा प्रयत्न असावा.
४. शासकीय/निमशासकीय/स्वयंसेवी/स्थानिक मंडळ/सामाजिक कार्य संस्था यांचा सहभाग घ्यावा.
५. शिबीर पूर्वतयारी म्हणून सहभागी होणाऱ्या स्वयंसेवकांच्या पालकांची बैठक आयोजित करावी.
६. प्राचार्य, सल्लागार समिती व विद्यापीठ कार्यक्रम समन्वयक यांच्यामध्ये समन्वयन साधणे.

**राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक उपक्रमांचे/विशेष दिवस/सप्ताह यांचे नियोजन**

| महिना | उपक्रम |
|---|---|
| जून | १. ५ जून - जागतिक पर्यावरण दिवस.<br>२. कार्यक्रम अधिकारी नियोजन बैठक<br>३. रा.से.यो. स्वयंसेवकाचे नोंदणी अर्ज व इतर आवश्यक माहिती.<br>४. 'आव्हान' आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीराचे आयोजन. |
| जुलै | १. ११ जुलै -जागतिक लोकसंख्या दिवस.<br>२. १ ते ७ जुलै - वन महोत्सव सप्ताह.<br>३. ८ ते १४ जुलै - आंतरराष्ट्रीय साक्षरता सप्ताह.<br>४. विद्यार्थ्यांची रा.से.यो. उपक्रमात नोंदणी.<br>५. कार्यक्रम अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण वर्ग.<br>६. नियमित उपक्रमांचा आरंभ |

| | |
|---|---|
| ऑगस्ट | १. १५ ऑगस्ट – स्वतंत्रता दिवस<br>२. २० ऑगस्ट – सदभावना दिवस<br>३. रा.से.यो: मधील विद्यार्थ्यांची नोंदणी पूर्ण करणे.<br>४. स्वयंसेवकांसाठी उद्बोधन सत्र.<br>५. गटनिहाय उपक्रमांचे नियोजन.<br>६. महाविद्यालयीन स्तरावर सल्लागार समितीचे गठन व बैठक<br>७. नेतृत्वगुण विकास शिबीराचे आयोजन (पाच दिवसीय)<br>८. दत्तक गाव निवड |
| सप्टेंबर | १. ११ सप्टेंबर – आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस<br>२. १५ सप्टेंबर – आंतरराष्ट्रीय शांतता दिवस<br>३. २४ सप्टेंबर – रा.से.यो. दिवस<br>४. विद्यापीठांकडे स्वयंसेवक नोंदणी यादी पाठविणे.<br>५. २४ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर – राष्ट्रीय सेवा योजना प्रचार व प्रसार सप्ताह साजरा करणे.<br>६. दत्तक गाव निवड<br>७. सात दिवसीय निवासी शिबिराचे नियोजन<br>८. अर्ध वार्षिक अहवाल तयार करून विद्यापीठाकडे सादर करणे.<br>९. नियमित कार्यक्रम व विशेष शिबिरासाठी अनुदानाचे प्रस्ताव विद्यापीठाकडे पाठविणे.<br>१०. प्रजासत्ताक दिन संचलन व उत्कर्ष – सामाजिक व सांस्कृतिक महोत्सवासाठी (स्वयंसेवकांची निवड.) |
| ऑक्टोबर | १. १ ऑक्टोबर – राष्ट्रीय रक्तदान दिवस<br>२. २ ऑक्टोबर – गांधी जयंती / आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस<br>३. दिवाळी सुट्टी दरम्यान शिबीरांचे आयोजन<br>४. राज्यस्तरीय / पश्चिम विभागीय / साहसी क्रिडा / युवा महोत्सव / मेगा शिबिर / राष्ट्रीय एकात्मता शिबिर इत्यादीसाठी स्वयंसेवकांसाठी निवड व प्रोत्साहित करणे. |
| नोव्हेंबर | १. १९ नोव्हेंबर – राष्ट्रीय आदानप्रदान दिवस<br>२. १९ ते २५ नोव्हेंबर – कौमी एकता सप्ताह<br>३. कौमी एकता सप्ताह साजरा करणे.<br>४. हिवाळी शिबीर आयोजित करणे.<br>५. आयोजित हिवाळी शिबीरांचे लेखे सादर करणे.<br>६. अर्धवार्षिक कार्यक्रम अधिकाऱ्यांची आढावा बैठक |
| डिसेंबर | १. १ डिसेंबर – जागतिक एडस् दिवस<br>२. १० डिसेंबर – जागतिक मानव अधिकार दिवस<br>३. जागतिक एडस् दिवस / सप्ताह मधील उपक्रमांचे आयोजन<br>४. नाताळ सुट्टीतील विशेष शिबीरांचे आयोजन<br>५. उत्कर्ष – सामाजिक, सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन |
| जानेवारी | १. १२ जानेवारी – राष्ट्रीय युवा दिवस<br>२. २६ जानेवारी – प्रजासत्ताक दिन<br>३. ३० जानेवारी – हुतात्मा दिवस<br>४. १२ ते १९ जानेवारी – राष्ट्रीय युवा सप्ताह |

| | | |
|---|---|---|
| | ५. | तिमाही अहवाल पाठविणे. |
| | ६. | राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे. |
| फेब्रुवारी | १. | १० गुण / १२० तास उपक्रमांची पडताळणी सत्र व १२० तास पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांची यादी आणि अहवाल सादर करणे. |
| | २. | २४० तास व शिबिरांचे प्रमाणपत्रासाठी यादी सादर करणे. |
| | ३. | इंदिरा गांधी राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कारासाठी एकक / कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवकांचे प्रस्ताव पाठविणे. |
| | ४. | नियमित कार्यक्रम व विशेष शिबीरांचे परिक्षित लेखांचे सादरीकरण |
| | ५. | कार्यक्रम अधिकाऱ्यांचा मूल्यमापन सत्रांचे आयोजन |
| मार्च | १. | ८ मार्च - आंतरराष्ट्रीय महिला दिवस |
| | २. | १० गुणांसाठी प्रमाणित याद्या परीक्षा विभागाकडे सादरीकरण |
| | ३. | अपरिहार्य कारणांमुळे परिक्षित लेखे सादर न करणाऱ्या महाविद्यालयांना लेखे सादर करण्याची अंतिम मुदत. |
| | ४. | सल्लागार समितीची बैठक |
| एप्रिल | १. | ७ एप्रिल - जागतिक आरोग्य दिवस |
| | २. | ग्रीष्मकालीन (Theme/Base) शिबिरांचे आयोजन |
| मे | १. | २१ मे - आंतकवाद विरोधी दिवस |
| | २. | ३१ मे - जागतिक धुम्रपान विरोधी दिवस |
| | ३. | राज्यस्तरीय आव्हान आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीरांकरिता विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया |
| | ४. | रा.से.यो. मधील वित्तीय वर्षातील स्वयंसेवकांसाठी प्रोत्साहनपर विशेष उपक्रम. |

राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमाची योग्यरितीने अंमलबजावणी व्हावी. यासाठी ही नियमावली तयार करण्यात आली असून ही सर्व मार्गदर्शक तत्वे आहेत. या आधारावर उपक्रम राबविले जावेत यादृष्टीने ही नियमावली तयार करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतलेला आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून संगणक संकेतांक क्रमांक २०१४०९०६१६४२०२३००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(डॉ. अतुल हं. साळुंके)
राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी)